# बृहन्मुंबई महानगरपालिका

## परिपत्रक

क्र.प्रले/पापुमनि/अर्थसंकल्प/एफ/०४ दि.०९.०७.२०१४

विषय: अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' (निधी संकेतांक:४०) चे सन २०१३-२०१४ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाची महापालिकेच्या स्तरावरील स्वीकृती.

संदर्भ : स्थायी समितीने दि.२६.०२.२०१४ रोजीच्या ठराव क्र.१२२४ अन्वये दिलेली मंजुरी.

.........

मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम १२६ ई (सुधारित) अन्वये स्थायी समितीस सादर करण्यात आलेल्या सन २०१३-२०१४ च्या सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजाना आणि सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पीय अंदाजाना काही फेरफार करुन स्थायी समितीने त्यांच्या दि.२६.०२.२०१४ रोजीच्या ठराव क्र.१२२४ अन्वये मंजुरी दिलेली होती. त्यानुसार मुंबई महानगरपालिका अधिनियम कलम १२६ फ (३) अन्वये स्थायी समितीने मंजूर केलेले सन २०१३-२०१४ चे सुधारित तसेच सन २०१४-२०१५ चे अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' महापालिकेस दि.०४.०७.२०१४ रोजी स्वीकृतीकरता सादर करण्यात आलेले होते.

२. वरील प्रमाणे स्थायी समितीने सादर केलेले सन २०१३-२०१४ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०१४-२०१५ चे अर्थसंकल्पीय अंदाज 'ग' **महापालिकेने त्यात काहीही फेरफार न करता** दि.०४.०७.२०१४ रोजी बोलाविलेल्या बैठकीमध्ये स्वीकृत केलेले आहेत.

३. स्थायी समितीस सादर करण्यात आलेले सन २०१३-२०१४ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाज तसेच सन २०१४-२०१५ वर्षाच्या अर्थसंकल्प 'ग' च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या संगणकीय प्रती सर्व खाते/विभागीय प्रमुखांना हया खात्यातर्फे यापूर्वीच वितरीत करण्यात आलेल्या आहेत.

४. सर्व खाते/विभागीय प्रमुखांनी कृपया याची नोंद घ्यावी.

सही/- ०९.०७.२०१४

**(सं. मा. बामणे)**

**प्रमुख लेखापाल (पापुमनि) प्रभारी**

**परिपत्रक**

क्र.प्रले/पापुमनि/अर्थसंकल्प/एफ/०४ दि.०९.०७ .२०१४

प्रत ........................................(... जादा प्रतींसह) माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

प्रमुख लेखापाल (पापुमनि) यांजकरिता

J:\A.O. Budget\Budget 2014-15\Circular 14-15.doc